महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग,
१ ला मजला, विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-३२.

---

राज्यशासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा सहायक कक्ष अधिकारी पदावर करारपध्दतीने विवक्षित कामासाठी घेण्याकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | विवक्षित कामाचे स्वरुप | आवश्यक सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचा संवर्ग | वय, अर्हता व अनुभव | पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | विभागात प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची तपासणी करणे/छाननी करणे, मंत्रीमंडळ टिप्पण्या व आदेश तयार करणे, आवश्यकतेनुसार विधेयकाचा मसुदा व इतर अनुषंगिक कामे तसेच मागासवर्ग कक्षासंबंधित कामे, अर्थसंकल्पीय व आस्थापनाविषयक बाबी (सेवाप्रवेश नियम तयार करणे, नवीन क्षेत्रिय आस्थापना तयार करणे, पदे वर्ग करणे इ.) / शिस्तभंगविषयक टिप्पणीलेखन, पत्रव्यवहार व प्रस्ताव तयार करणे. | सहायक कक्ष अधिकारी /कक्ष अधिकारी पदावरुन सेवानिवृत्त | ३ वर्ष अनुभव, वयोमर्यादा कमाल ६५ वर्षे | ९ |

## नियुक्तीच्या अटी व शर्ती

१. सदर नियुक्त्या शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकिर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७/१२/२०१६ मधील तरतुदीनुसार करण्यात येतील. तसेच सदर शासन निर्णयानुसार आर्थिक लाभ देण्यात येतील.
२. सदर नियुक्त्या केवळ एक वर्षाच्या कालावधीकरीता अथवा शासनाकडून नियमित अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती यापैकी जे अगोदर घडेल तेवढ्या कालावधीकरीता असेल.
३. इच्छूक सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज parag.wakde@nic.in या ई-मेल आयडीवर, आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासह ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत सादर करावेत. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.
४. इच्छूक सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचाऱ्यांनी त्यांच्याविरुद्ध कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसलेबाबत किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसल्याबाबत स्वयंघोषणापत्र सादर करावे.
५. मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण क्षेत्रातील अर्जदाराने कृपया करार पध्दतीने नियुक्तीकरीता अर्ज करावा.
६. मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांचीच निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील.
७. कराराच्या कालावधीत सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या नियंत्रणाखाली काम करतील.

**संपर्क**- अवर सचिव (आस्थापना-१), रुम नं.१३९, १ ला मजला, विस्तार इमारत, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-३२, दुरध्वनी क्र. ०२२-२२८२३८२१.

---ooo---